**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.११/०८/१७**
**दि.१०/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे १८९/१७,भादविक ३०७,३४ |
| **फिर्यादी** | सुर्यप्रकाश सतनामी,वय-३२,रा.तुळजाभवानी नगर,खराडी,पुणे |
| **आरोपी** | १.गिरेंद्र देवाई सतनामी,वय-२६,रा.जय जवान नगर येरवडा,पुणे २.प्रकाश अगनु सतनामी,वय-३१,रा.तुळजा भवानीनगर,खराडी,पुणे ३.सागर मनीराम सेटीया,वय-२२,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०८/१७ रोजी १९/१५ वा.बेरील सोसायटी जवळ पुणे मनपाचे मोकळया जागेत खराडी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मेव्हणा ओमप्रकाश सतनामी,वय-३२ व नमुद इसम यांचेमध्ये पैशाचे देवाण-घेवाणीचे कारणावरुन झालेल्या वादातुन सदर इसमांनी ओमप्रकाश याचे डोक्यात दगडाने मारुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) पाटील ९५४५९ ०३१०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ३०७/१७,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | पो.हवा.मोरे, वारजे पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | दत्ता दिगंबर दाईजोड,रा.स्प्रिंग एक्सप्रेस रुम,बालेवाडी,पुणे(मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०८/१७ रोजी १४/३० वा. डुक्कर खिंड वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम दत्ता दिगंबर दाईजोड,रा.स्प्रिंग एक्सप्रेस रुम,बालेवाडी,पुणे याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलवरून स्वतः रोडवरून घसरून खाली पडुन त्यामध्ये गंभीर जखमी होवुन,दत्ता दिगंबर दाईजोड हा स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. सोळंखी ९५२७४४६८६८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ७९०/१७,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | युवराज कांबळे,पोलीस नाईक, हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात वाहन चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिं.०९/०८/२०१७ रोजी २३/५५ वा.चे पुर्वी ए.एम.कॉलेजच्या समोर मांजरी हडपसर,पुणे येथे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी अनोळखी इसम वय अंदाजे ३५ वर्षे,रंगाने गोरा,अंगाने मध्यम,चेहरा उभट,अंगात उभ्या रेषा असलेला फिकट निळसर शर्ट व निळी जिन्स पॅन्ट अशा वर्णनाचे इसमास जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.एम ए डोके ८६५२१४७५७५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २६७/१७,भादविक ३९४,५०४,४२७,३४ |
| **फिर्यादी** | विठ्ठल घाडगे,वय-२५,रा.मुंपो.आतिथ,ता.सांगोला,जि.सोलापुर |
| **आरोपी** | १.नितीन पोपट लोंढे,वय-३१,रा.भगीरथनगर,वारजे,पुणे २.जितेश उर्फ बंटी भास्कर सोनवणे,वय-२४,रा.वारजे,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०८/१७ रोजी रात्रौ ००/४५ वा.देहुरोडकडे जाणा-या वडगांव ब्रिजवरील रोडवर सिंहगड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा ट्रेलर ट्रक घेऊन जात असताना,नमुद ठिकाणी यातील नमुद मोटार सायकलवरुन आलेल्या इसमांनी फिर्यादीस थांबवुन ट्रकचे दोन्ही बाजुने आत मध्ये येऊन फिर्यादी यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करुन,फिर्यादी यांचेकडील मोबाईल,रोख असा एकुण १२,०००/-रु किचा ऐवज जबरदस्तीने काढुन घेवुन चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सोनवणे ९८२२२८५८४८ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३१७/१७,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | सौ.सुलोचना काळे,वय-५० वर्षे,रा.शास्त्री चौक,रामनगरी,भोसरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०८/२०१७ रोजी दु.१३/३० वा.शासकीय मुलांचे अनुरक्षण गृह डॉमेटरी रूम मधुन कॉमर झोन जवळ,जात पडताळणी ऑफिसचे समोर येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे शासकीय मुलांचे वसतीगृह याठिकाणी वरिष्ठ काळजीवाहक या पदावर आहेत. फिर्यादी हे त्यांचे कार्यालयात कर्तव्य करीत असतांना,त्याचे डॉमेटरी रूम मधील १०,०००/- रू किचा एक एलसीडी काळया रंगाचा टी.व्ही. काणीतरी अज्ञात चोरटयाने ऑफीसचे उघडया दरवाजा वाटे आत प्रवेश करून,फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. कांबळे |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ३७१/१७,भादविक ३३२,३५३,५०४ |
| **फिर्यादी** | पिंकी तिवडे,वय-२८,रा.वडगांव-धायरी,पुणे (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.पुणे) |
| **आरोपी** | गौतम प्रकाश परदेशी,रा.सनं.१३/१४,जोशी वाडा,सदाशिव पेठ,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०८/१७ रोजी १२/३० ते १२/४५ वा. सनं.१३/१४,जोशी वाडा,सदाशिव पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.पुणे याठिकाणी तंत्रज्ञ या पदावर लोकसेवक या पदावर आहेत. फिर्यादी हया त्यांचे शासकीच कामाचे अनुषंगाने त्यांचे सहकारी नामदेव एकनाथ भोसले यांचेसह नमुद इसमाचे ठिकाणी खंडीत केलेली वीज जोडणी पुन्हा चालु करण्यासाठी गेले असताना,सदर इसमाने त्याठिकाणी येवुन फिर्यादी यांना तुम्ही आमचे घरातील लाईट का बंद केली असे म्हणुन चिडुन जावुन त्याने फिर्यादी यांना अपशब्द वापरून त्यांना धक्का-बुक्की करून ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.एस बी पाटील ९८९२७५३३७४ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ३८९/१७,भादविक ३५४,३५३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,पो.हवा. हिंजवडी वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | परिक्षीत प्रभाकरराव देशमुख,वय-३७ वर्षे,रा.एम्प्रेस पार्क,रुम नं.१०२,बालेवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०८/२०१७ रोजी ०९/०५ वा. भुमकर चौक,वाकड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया हिंजवडी वाहतुक विभागात कर्तव्यावर असुन,फिर्यादी हया भुमकर चौकात वाहतुक नियमन करून त्यांचे सरकारी कर्तव्य बजावित असताना,यातील नमुद इसमाने त्याचे मोटार सायकलवरून मुंबई-बेंगलोर हायवेच्या सर्व्हिस रोडने विरूध्द दिशेने येत असताना,फिर्यादी यांनी त्यास थांबण्याचा इशारा केला असता,त्योन फिर्यादी यांना हातवारे करून अपशब्द वापरून तीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून त्यांचे अंगावर मोटार सायकल घालुन जखमी करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक,व्ही.एस.धुमाळ९८९०८०२८६९ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३१८/१७,भादविक ३७९,५११ |
| **फिर्यादी** | राजेश मिश्रा,वय-४० वर्षे,रा.लोहगाव,धानोरी रोड,पुणे |
| **आरोपी** | एक २० ते २५ वर्षाचा इसम,उंची अंदाजे ५.५ फुट,काळ्या रंगाचे जॅकेट घातेलला, तोंडाला पांढऱ्या काळ्या रंगाचा चेक्सचा रुमाल बांधलेला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०८/२०१७ रोजी २१/५२ ते दि.०७/०८/२०१७ रोजी रात्रौ ००/०४ वा. चे दरम्यान कॅनरा बॅक लोहगाव शाखा,ए.टी.एम सेंटर मध्ये लोहगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे कॅनरा लोहगाव शाखा,पुणे येथे प्रबंधक म्हणुन नोकरीस असुन त्याचे कॅनरा बॅकेलगत असलेले ए.टी.एम. सेंटरवर एका अनोळखी इसमानेरात्रीच्या सुमारास दगडाने सदरचे ए.टी.एम मशीन फोडुन,त्यातील पैसे चोरी करण्याचा प्रयत्न करीत असलेबाबत सी.सी.टी.व्ही फुटेजमध्ये दिसल असल्याने,सदर अनोळखी इसमाविरुध्द वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.ए.डी.पिंगळे |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६७९/१७,भादविक ४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | झेबा खान,वय-२४ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०८/२०१७ रोजी १४/०० ते १९/३० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी येरवडा पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | OLX- APPया वेबसाईटवर कार नं.MH02-DZ-४५८ ही ३,५०,०००/- रुपये किंमतीस विक्रीसाठी असल्याची जाहीरात संगनमताने फसवणुक करण्याचे इरादयाने गाडीचे फोटोसहटाकल्याने फिर्यादी यांनी त्यांचेशी गाडी खरेदीसाठी वेळोवेळी संपर्क साधुन त्यांचे सांगणेप्रमाणे फिर्यादी यांनी बँकेचे खात्यावर ४९,२०० रुपये व १,२०,०००/- रुपये असे एकुण १,६९,२००/- रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करण्यास प्रवृत्त करून,त्यांना कार न देता सदरचा फोन बंद करुन फिर्यादी यांची फसवणुक केलेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे), कदम |

१०

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३१७/१७,भादविक ४१९,३४ |
| **फिर्यादी** | इजाज काझी,वय-२७,रा.भाग्योदय नगर,कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | १.विकी कुमार उर्फ प्रभाकर कुमार,वय-२२,रा.बिहार २.राकेश रोशन,वय-२२,रा.बिहार (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०८/१७ रोजी ०८/३० ते ०९/३० वा. चे दरम्यान मिनु मेहता नगर कोंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,एस.एस.सी.चे परिक्षेकरीता डमी बसवुन तोतयागिरी करुन परिक्षा देण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कर्चे |

११

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३१९/१७,भादविक ४२०,४०६,३४ व महाराष्ट्र ओनरशिफ ॲक्ट १९६३ चे क.३ |
| **फिर्यादी** | नितीन चव्हाण,वय ५२ वर्षे,रा.जवळकरनगर,पिंपळे-गुरव,पुणे |
| **आरोपी** | १.सुमीत भलोटीया २.शहाजी उकीरडे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे डिसेंबर २०१३ ते आजपर्यतचे कालावधीत विमाननगर,बकोरी,वाडे बोल्हाई येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सुमित भलोटिया यांने स्कायमॅक्स मॉल ऑफिस नं.२११, दत्त मंदिर चौक, विमाननगर,पुणे या ठिकाणी स्पार्क रियालीटी नावाने ऑफिस उघडुन डोंगरगाव येथील गट नं. ३६५ व ३६६ याठिकाणी कंपनीची साईट चालु असल्याचे सांगुन व फिर्यादी यांना सदरची साईट ऑफिस बॉय मार्फत दाखवुन त्यांचा विश्वास संपादन करुन,विमाननगर,बकोरी,ता.हवेली जि.पुणे येथील गट नं.८२,८६,८० मधील प्लॉट तसेच वाडे-बोल्हाई,ता.हवेली,जि.पुणे येथील स्पार्क अर्बन ब्लीस प्रोजेक्ट मधरल फलॅट हे फिर्यादी व इतर ११ साक्षीदारांना रजिस्टर खताद्वारे विक्री करुन,सदरचे प्लॉट व फलॅटचा ताबा न देता,फिर्यादी यांची २७,७४,१०० /- रु. रूची व इतर ११ साक्षीदारांची असे एकुण २,०७,२५,१५० /- रुची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.बी. खेडकर |

## <u>दि.११/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २९९/१७,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | निशीगंधा जोशी,वय-२५,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०८/१७ रोजी २१/०० ते दि.१०/०८/१७ रोजी २१/०० वा. चे दरम्यान फ्लॅट नं.१२,शशीकांत टेरेस मंत्री पार्क मागे कोथरूड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील लाकडी कपाटातील सोन्याचे दागिने ४ लाख रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. रघुनाथ फुगे |

**दि.१०/०८/१७रोजी ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचा अटक आरोपी तक्ता**

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | चंदननगर | भादविक ४५७,३८० | संतोष छोटु जाधव | ३६ |
| २ | चंदननगर | भादविक ४५७,३८० | अशोक मारूती गायकवाड | २० |
| ३ | चंदननगर | भादविक ४५७,३८० | प्रभु बाबुराव जाधव | ४५ |
| ४ | येरवडा | भादविक ४६५,४६८,४७१,४२०,३४ | राहुल किशोर गायकवाड | ३२ |
| ५ | येरवडा | भादविक ४६५,४६८,४७१,४२०,३४ | रोहित किशोर गायकवाड | २५ |
| ६ | येरवडा | भादविक ४६५,४६८,४७१,४२०,३४ | प्रविण अर्जुन गाडे | २९ |
| ७ | सांगवी | भादविक ४२०,३४ | गणपती चनाप्पा मलीशे | २२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**